
| Article Date | Headline / Summary | Publication |
|---|---|---|
| 9 Dec 2024 | What does travel insurance cover if a flight is canceled by myself or the company? | Kesari |

# विमान प्रवास स्वत: किंवा कंपनीने रद्द केल्यास प्रवासी विमा कवचात काय?

सध्याच्या अस्थिर वातावरणात सहलीचे नियोजन करत असताना प्रवासी विमा अविभाज्य भाग बनला आहे. विश्रांती, व्यवसाय किंवा वैयक्तिक कारणामुळे किंवा आणीबाणीचे प्रसंग किंवा विमान कंपनीने उड्डाण रद्द केल्यास प्रवासावर पाणी पडते. अशा वेळी प्रवासी विमा विमाधारकाराला आर्थिक नुकसानीपासून वाचवू शकतो. पण, प्रवासी विमा पॉलिसीत रद्द होणारे सर्वच प्रवास आणि सर्वासाठी मिळणारे लाभ एकसारखे नसतात. एखाद्याने स्वत: प्रवास रद्द करणे किंवा विमान कंपनीकडून रद्द होणे यात फरक असतो. त्यासाठी विमा कवचामध्ये काय आहे, काय नाही, हे आता पाहू.

**स्वत:हून प्रवास रद्द केल्यास प्रवासी विम्याचे कवच**

एखादा व्यक्ती स्वत:हून अचानक प्रवास रद्द करतो. त्यामध्ये वैयक्तिक कारण, आरोग्याचा मुद्दा, कौटुंबिक आीणबाणी किंवा अन्य कारणांमुळे त्याचा नियोजित प्रवास रद्द होतो. अशा घटनांत प्रवासी विमा त्याचे संरक्षण करू शकतो. पण, त्यासाठी काही विशेष अटीमुळे त्याचा विमा दावा स्वीकारला जातो.



**आशिष सेठी**
हेड, हेल्थ ॲन्ड ट्रॅव्हल एसबीयु,
बजाज आलियांझ जनरल इन्शुअरन्स

**स्वत:हून प्रवास रद्द केल्यास विमा कवचात काय?**

**१) वैद्यकीय आणीबाणी** : वैद्यकीय कारणांवरून प्रवास रद्द केल्यास विमा पॉलिसीत विमा कवच सर्वसाधारणपणे मिळते. जर विमाधारक, त्याच्यासोबत प्रवास करणारा व्यक्ती किंवा जवळचा कुटुंबीय गंभीर आजारी पडला, जखमी झाला किंवा त्याचा मृत्यू झाला तर, विमा कंपन्या प्रवासाचा न मिळणारा परतावा विमाधारकाला देऊ शकतात. मात्र, त्यासाठी वैद्यकीय पुरावा लागतो. त्यामध्ये डॉक्टरांची चिठ्ठी किंवा वैद्यकीय अहवालाचा समावेश असावा

**२) कौटुंबिक आणीबाणी** : जर एखाद्या घटनेत जवळच्या कुटुंबीयाचा, सदस्याचा मृत्यू किंवा गंभीर आजारी असल्यास प्रवासी विम्याचे कवच प्रवास रद्द केल्याची भरपाई देते. जवळच्या कुटुंबीय सदस्यांमध्ये पत्नी, पालक, मुले, भाऊ आणि आजोबा, आजी यांचा समावेश आहे. प्रत्येक विमा पॉलिसीत जवळच्या व्यक्तीची व्याख्या, विमा पात्रतेची माहिती दिलेली असते. त्यामुळे पॉलिसी घेण्यापूर्वी ती काटेकोरपणे वाचावी.

**३) व्यक्तिगत घडणाऱ्या घटना** : मानवी आयुष्यात अचानक घटना घडतात. त्यात नोकरी जाणे किंवा अत्यावश्यक न्यायालयीन कामकाज यांचा समावेश असतो. अशा प्रकरणात स्वत:हून प्रवास रद्द केल्यास भरपाई मिळते. पण, प्रत्येक विमाधारकांसाठी अटी आणि शर्ती या विमा कंपन्यांच्या वेगळ्या आहेत.

**४) नैसर्गिक आपत्ती आणि राजकीय अस्थैर्य** : नैसर्गिक आपत्ती आणि राजकीय अस्थैर्यामुळे प्रवास असुरक्षित होतो. त्यामुळे स्वत:हून प्रवास रद्द केल्यास काही कंपन्या अशा विम्यात कवच देतात. त्यामुळे विमाधारकाला जाणूनबुजून धोकादायक क्षेत्रात प्रवास करणे भाग पडत नाही.

**स्वत: प्रवास रद्द केल्यास विमा कवचात काय नाही ?**

**१) योजनेत बदल किंवा वैयक्तिक निवड** : एखाद्याने मन बदलले म्हणून प्रवास रद्द केला, प्रवास नियोजनाबद्दल नाराजी किंवा अचानक प्रवासाला जाण्याचा बेत बदलला, प्रवास स्वत:हून अचानक रद्द करणे, त्याचे ठोस कारण नाही दिले तर, प्रवासाची भरपाई मिळत नाही.

**२) आर्थिक संकट किंवा नोकरी संबंधित मुद्दे** : आर्थिक अडचणींमुळे प्रवास रद्द करणे ज्यामध्ये प्रवासाचा खर्च उचलू शकत नाही किंवा छोटी कामे असल्याचे कारण सांगणे, अशा बाबी विमा कवचाचा भाग बनू शकत नाहीत; पण विशेष कामाविषयीचा मुद्दा जसा अचानक कामावर जाणे भागच पडणे, या बाबी विमा कवचाचा भाग बनू शकतात.

**विमान रद्द झाल्यास प्रवासी विमा**

अनेकदा विविध कारणांमुळे कंपन्या विमानाचे उड्डाण रद्द करतात. त्यात हवामानातील बदल, अन्य अचानक घडणाऱ्या घटनांचा समावेश असतो. त्यामध्ये कंपन्या दिवाळखोरीत जाणे किंवा आर्थिक अडचण निर्माण होणे, दहशतवादी हल्ला इत्यादींचा समावेश आहे. अशा परिस्थितीत विमान कंपन्या भरपाई देऊ शकत नाहीत. मात्र, विमा कंपन्या ती देऊ शकतात.

**विमान रद्द झाल्यास विमा कवचात काय ?**

**१) तांत्रिक बिघाडामुळे विमान उड्डाण रद्द** : तांत्रिक बिघाड, कर्मचाऱ्यांचा अभाव किंवा वाहतुकीतील आव्हाने अशा कारणांमुळे अनेकदा विमानांचे उड्डाण रद्द केले जाते. पर्यायाने प्रवास रद्द झाल्यास विम्याचा फायदा मिळतो, भरपाई मिळते. त्यामध्येत पूर्वीच राहण्यासाठी केलेल्या हॉटेल बुकींगच्या खर्चाचा किंवा ना परतावा विमान प्रवासाच्या खर्चाचा समावेश असतो. अशा घटनांत तातडीने मदत आणि परतावा देण्याची विमान कंपन्यांची जबाबदारी असते. प्रवासी विम्यानुसार जो परतावा विमान कंपन्या देत नाहीत. तो दिला जातो.

**२) हवामान बदलामुळे विमान उड्डाण रद्द होणे** : हवामानातील बदलामुळे विमान प्रवास रद्द किंवा प्रवास लांबणे अशा वेळी प्रवासी विमा महत्त्वाचा ठरतो. त्यामध्ये प्रवासाच्या प्रारंभी अथवा शेवटी वादळ किंवा चक्रीवादळ येणे, जर विमा कंपन्या पर्यायी व्यवस्था करू शकल्या नाही तर, नुकसान भरपाई देऊ शकल्या नाहीत, तर प्रवासी विम्यामुळे ती मिळू शकते.

**विमान रद्द झाल्यास विमा कवचात काय नाही ?**

**१) विमा कंपन्यांनी थेट परतावा दिला** : जर एखाद्या प्रकरणात विमान रद्द झाल्यास कंपनीने कायदेशीरपणे एखाद्याला भरपाई दिली तर, प्रवासी विम्यातील अतिरिक्त खर्च मिळू शकणार नाही. कारण प्रवाशाने तो अगोदरच प्राप्त केलेला असतो.

**२) विमानाचे उड्डाण रद्द होण्याची पूर्वसूचना असणे** : संप किंवा राजकीय अस्थैर्याबाबतची अगोदरच सार्वजनिक माहिती दिली असूनही एखाद्याने विमानाचे तिकीट काढले आणि प्रवास करण्याचे ठरविले. मात्र, नंतर विमानाचे उड्डाण रद्द झाले तर विमाधारकाने केलेला भरपाईचा दावा फेटाळला जाऊ शकतो. कारण विमानाचे उड्डाण रद्द होण्याची कारणे अगोदरच माहीत असतील, तर ती प्रवासी विमा कवचात येत नाहीत आणि त्यासाठी भरपाई देखील दिली जात नाही.

**निष्कर्ष** : प्रवासी विमा प्रवाशांच्या सुरक्षेला प्राधान्य देतो. त्यामध्ये सहल रद्द होण्याच्या धोक्याचा समावेश असतो. एखाद्याने स्वत:हून किंवा विमान कंपनीने हवामान बदलामुळे प्रवास रद्द केल्यास प्रवास खर्च परत मिळण्याची हमी विमा कवचात आहे. त्यामध्ये ना परतावा खर्चांचा देखील समावेश असतो. विमाधारकांनी प्रवासी विमा घेण्यापूर्वी त्यामध्ये कोणत्या बाबींना विम्याची हमी आहे किंवा नाही, हे पडताळून पाहिले पाहिजे. वैद्यकीय आणीबाणी, कौटुंबिक संकट आणि अचानक घडणाऱ्या घटनांत स्वत:हून प्रवास रद्द केल्यास परतावा मिळतो. मात्र, मन परिवर्तन होऊन अचानक प्रवासाचा बेत बदलल्यास परतावा मिळत नाही. मात्र, विमान कंपनीने विमानाचे उड्डाण रद्द केले, तर कंपनी देणाऱ्या परताव्याखेरीज अतिरिक्त केलेला खर्च परत मिळू शकतो. पण, अगोदरच कंपनीने भरपाई दिली तर तो मिळू शकत नाही. प्रवासी विम्यात काय आणि काय नाही ? याचा सांगोपांग विचार विमा खरेदी करण्यापूर्वी प्रत्येक भारतीय प्रवाशाने करावा. त्या माध्यमातून विम्याचे कवच धारण करून प्रवास अधिक सुखकर मानसिक समाधानाने आणि अधिक आर्थिक सुरक्षेत नक्कीच होईल.